सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५

आतील पानावर

पान २– बॉबीचा मुलगा बॉलिवूडमध्ये
पान ३– सोनम कपूर करणार कमबॅक
पान ४– खरं प्रेम काय असते, हे कोणीच ...
पान ५– गश्मीर महाजनीचा आगामी चित्रपट येणार
पान ६– वाढत्या वयावर चित्रांगदा बोलली!



# 'कल्कि २' सिनेमात आता साई पल्लवी ?

गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री दीपिका पादुकोण चर्चेत होती. आई झाल्यानंतर तिला २ सिनेमांमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. तिने केलेल्या ८ तासांच्या शिफ्टच्या मागणीमुळे आणि इतर काही अटींवरुन तिला सिनेमातून काढण्यात आलं. तर आता आलिया भटला एका साउथ सिनेमातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. तिच्याजागी अभिनेत्री साई पल्लवीची निवड करण्यात आली आहे. कोणता आहे तो सिनेमा? फिल्ममेकर नाग अश्विन यांची फिमेल सेंट्रिक सिनेमात आलिया भट दिसणार अशी बातमी गेल्या वर्षीच आली होती. आलियासोबत त्यांची चर्चाही झाली होती. मात्र, या गोष्टीला आता ११ महिने झाले. नाग अश्विन यांच्याच 'कल्कि २' सिनेमातून दीपिका पादुकोणला काढण्यात आलं. 'कल्कि २'साठी सध्या कास्टिंगचा विचार होत असल्याने नाग अश्विन यांनी मध्ये आपल्या फीमेल सेंट्रिक सिनेमावर लक्ष द्यायचं ठरवलं. मीडिया रिपोर्ट्सनुसार आलिया भटने मार्च २०२६ च्या अनेक तारखा मॅडॉक फिल्म्सला दिल्या आहेत. त्यांच्या 'चामुंडा' सिनेमात ती दिसणार आहे. यामुळेच आता नाग अश्विन यांनी साई पल्लवीसोबत बोलणी सुरु केली आहेत. ॲक्शन ड्रामा सिनेमांसाठी साई पल्लवी त्यांची कायमच आवडती अभिनेत्री राहिली आहे. तर दुसरीकडे साई पल्लवी सध्या 'रामायण' सिनेमात व्यग्र आहे. तिने संपूर्ण वेळ नितेश तिवारींच्या या सिनेमाला दिला आहे. सिनेमाच्या दुसर्‍या भागाचंही तिचं शूट लवकरच पूर्ण होणार असल्याची चर्चा आहे. यानंतर ती नाग अश्विन यांच्या सिनेमाचं काम पुढील वर्षात करु शकते.





# बॉबीचा मुलगा बॉलिवूडमध्ये

कपूर, खान आणि बच्चन कुटुंबांप्रमाणेच देओल कुटुंबानेही भारतीय चित्रपटसृष्टीवर मोठी छाप पाडली आहे. धर्मेंद्र, सनी, बॉबी आणि ईशा देओल यांनी अभिनयाच्या क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केली. आता देओल कुटुंबातील तिसरी पिढीही चित्रपटसृष्टीत नशीब आजमावत आहे. सनी देओलचा मुलगा करण आणि राजवीर देओल यांच्या कारकिर्दीनंतर आता बॉबी देओलचा मुलगा आर्यमान देओल लवकरच बॉलिवूडमध्ये एन्ट्री घेणार आहे.

सध्या 'The Badr of Bollywood' वेब सीरिजमुळे चर्चेत असलेल्या बॉबी देओलने नुकतीच एका मुलाखतीत लेकाबद्दल मोठा खुलासा केला. एका मुलाखतीत बॉबीने सांगितले की, आर्यमानला चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्याची इच्छा आहे. तो लवकरच इंडस्ट्रीमध्ये प्रवेश करू शकतो. बॉबी देओलने स्पष्ट केले की, आर्यमान सध्या अनेक मोठ्या ऑफर्स मिळत आहेत. पण, पूर्ण तयारीशिवाय अभिनेता आपल्या लेकाला इंडस्ट्रीत लॉन्च करणार नाही. बॉबी म्हणाला, तो काम करत आहे आणि प्रशिक्षण घेत आहे. त्याला अनेक ऑफर येत आहेत. पण, पोहायला शिकल्याशिवाय मी त्याला समुद्राच्या मध्यभागी फेकून देऊ इच्छित नाही.

आर्यमान हा सोशल मीडियावर फारसा सक्रीय नाही. आर्यमानला लाइमलाइटमध्ये राहायला फारसं आवडत नाही. अलिकडेच पार पडलेल्या 'The Badr of Bollywood'च्या प्रिमियरमध्ये त्याला वडिलांसोबत पाहिलं गेलं. त्या कार्यक्रमातील त्याचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. देओल कुटुंबाचा हा नवा सदस्य बॉलिवूडमध्ये कधी आणि कोणत्या चित्रपटातून पदार्पण करतो, याकडे चाहत्यांचे लक्ष लागून राहिले आहे. बॉलिवूडमध्ये पदार्पण केल्यानंतर तो इतर स्टारकिड्सना चांगलंच आव्हान देईल असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

# घटस्फोटानंतर अभिनेत्री एक्स पतीसह पुन्हा एकत्र



ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र व हेमा मालिनी यांची मुलगी ईशा देओलनं गेल्या वर्षी पती भरत तख्तानीपासून विभक्त झाल्याची घोषणा केली. दोघांनी गेल्यावर्षी एका निवेदनाद्वारे आम्ही दोघांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे, असं म्हणत विभक्त होण्याची घोषणा केली होती. मात्र, वर्षभरातच हे जोडपं पुन्हा एकदा एकत्र आलं आहे. वर्षभरानं ईशा आणि भरत दोघे पुन्हा एकत्र आले आहेत आणि दोघांचा एकत्र फोटो स्वत: भरतने त्याच्या सोशल मिडिया अकाऊंटद्वारे शेअर केला आहे. या दोघांबरोबर ईशाची बहीण अहाना आणि त्यांची एक मैत्रिणीही होती. भरतने स्वत: त्यांच्या या खास भेटीचा एक फोटो आपल्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. भरतने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक सेल्फी फोटो शेअर केला आहे. या सेल्फी फोटोत ईशा, तिची बहीण अहाना आणि तिच्या शेजारी त्यांची एक मैत्रीणही असल्याचं दिसत आहे. तसंच भरतने स्वत: हा सेल्फी फोटो काढला असून त्याने 'फॅमिली संडे' अशी कॅप्शन या फोटोला दिली आहे. काही दिवसांपूर्वी, ईशा म्हणाली होती, कधी कधी जीवनात काही गोष्टींमुळे जबाबदाऱ्या बदलतात. दोन व्यक्तींमधील नातं पूर्वीसारखं नसेल, दोघे वेगवेगळे राहत असतील, तरीदेखील त्यांना मुलांसाठी एकत्र राहणं गरजेचं असतं आणि हेच आम्ही करत आहोत. अशातच आता त्यांनी पुन्हा एकत्र फोटो शेअर केला आहे.

# नवऱ्यामुळे वापरत नाही सोशल मीडिया

अभिनेत्री राणी मुखर्जीला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात राणीच्या खास लूकने लक्ष वेधून घेतलं. तिने पुरस्कार सोहळ्यात सुंदर साडी नेसली होती. तसेच लेक आदिराच्या नावाचा नेकलेस घातला होता. राणी मुखर्जी सोशल मीडियावर सक्रिय नसल्याने राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात तिची झलक दिसणं ही चाहत्यांसाठी पर्वणी होती. राणी मुखर्जी कोणतेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरत नाही. त्यामागचं कारण तिने स्वतःच सांगितलं आहे. सोशल मीडिया न वापरण्याचं कारण राणीचा पती आदित्य चोप्रा आहे. राणीने यावेळी तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही भाष्य केलं. तू इन्स्टाग्रामवर आहेस का? असा प्रश्न विचारल्यावर राणी म्हणाली, नाही. मी सोशल मीडियावर नाही. राणी मुखर्जी सोशल मीडियावर नाही, त्यामागचं कारण तिला विचारण्यात आलं. लोकांनी आपल्याला पाहावं, अशी माझ्या पतीची इच्छा नाही. आणि मला सोशल मीडियावर येऊन अडचणीत यायचं नाही. कारण पतीला फोटो पोस्ट केलेले आवडत नाही, जर मी फोटो पोस्ट केले नाही आणि चाहते विचारतील की माझ्या नवऱ्याचा फोटो कुठे आहे? तर ते मिस्टर इंडिया आहेत असं उत्तर मला द्यायचं नाही. बरेच सेलिब्रिटी डिनरला जाताना किंवा एअरपोर्टवर पापाराझींना फोन करून बोलावतात. असाच प्रश्न राणीला विचारण्यात आला. आदि आणि मी या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जात आहोत, असं तू पापाराझींना फोन करून सांगतेस का? असं विचारल्यावर राणी म्हणाली, अरे देवा, अजिबात नाही. ही खरोखर खूप वैयक्तिक गोष्ट आहे. म्हणजे, मला खासगी गोष्टी अशा लोकांना सांगायला आवडत नाही. राणी मुखर्जी सोशल मीडियावर सक्रिय नाही. तसेच ती फारसे चित्रपट करत नाही, त्यामुळे चाहत्यांना तिचे फोटो व व्हिडीओ फार पाहायला मिळत नाही. आता राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने बऱ्याच दिवसांनी तिची झलक चाहत्यांना मिळाली. राणी मुखर्जी बऱ्याच काळापासून कोणत्याही चित्रपटात झळकली नाही. ती शेवटची २०२३ मध्ये आलेल्या 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात दिसली होती.



# मला शंभर कोटी दिले तरी, त्याच्यासोबत काम नाही!

संगीतकार इस्माइल दरबार आणि दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांची जोडी उत्तम मानली जायची, पण सध्या त्यांच्यात बिनसल्याचं बोललं जातं आहे. एका मुलाखतीदरम्यान, संजय लीला भन्साळींना 'अहंकारी' म्हटलं. इतकेच काय तर त्यांना १०० कोटी रुपये ऑफर केले तरी ते त्यांच्यासोबत काम करणार नाही, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. 'हम दिल दे चुके सनम' असो किंवा 'देवदास', त्यांच्या कलाकृतीतील हे दोघेही एकत्र आले, तेव्हा ते हिट झाले. पण त्यांच्यात काही तरी बिनसलं आणि त्यांचे मार्ग वेगळे झाले.

'हीरामंडी: द डायमंड बाजार'चं म्युझिक ही सीरिजचा सर्वात मजबूत बाजू असल्याचं बोललं गेलं आणि याचं सर्व श्रेय इस्माईल दरबारला दिलं गेलं. तेव्हा-पासूनच दोघांच्या मैत्रीत दुरावा आल्याचं पाहायला मिळतंय. दरबारनं ही बातमी पसरवली, असं संजय लीला भन्साळी यांना वाटलं, ज्यामुळे त्यांच्या नात्यात मोठा तणाव निर्माण झाला. यानंतर दरबार यांनी ही सीरिज सोडली. दरबार यांना विचारण्यात आलं की, भन्साळींनी त्यांना परत बोलावण्याचा प्रयत्न केला का? यावर दरबार म्हणाले, मी भन्साळींना सांगितलं होतं की, जर मला काही बोलायचं असेल तर मी उघडपणे बोलण्यास घाबरणार नाही. पण मला त्या बातमीबद्दल काहीही माहिती नव्हती. ज्यानंतर मी स्वतःहून हीरामंडी सोडली, कारण मला समजलं की, तो मला काढून टाकण्याचा विचार करतोय. दरम्यान, संजय लीला भन्साळींनी इस्माईल दरबार कार्यालयात बोलावलं आणि चौकशी केली, ज्यामुळे दरबार यांना वाटलं की, भन्साळी त्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न करत आहेत. इस्माइल दरबारनं असाही खुलासा केलाय की, 'गुजारिश'मध्येही तो संजय लीला भन्साळी यांच्यासोबत काम करणार होता, पण 'हम दिल दे चुके सनम' आणि 'देवदास' दरम्यान झालेल्या मतभेदांनी त्यांचं नातं खराब केलं. भन्साळींनी त्यांच्या पीआर टीमला इस्माइल दरबारची मुलाखत घेऊ नका, असे निर्देशही दिले होते. आज, जर संजय माझ्याकडं आला आणि म्हणाला, कृपया माझ्या चित्रपटासाठी संगीत दे, मी तुला १०० कोटी रुपये देईन, तर मी त्याला पैसे घेऊन येथून निघून जाण्यास सांगेलं.'



# मी तिला दोष देत नाही पण...

बॉबी देओल बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांत काम करत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. अशातच अभिनेत्याला इंडस्ट्रीत ३० वर्षं पूर्ण झाली आहेत. अभिनेत्याने १९९५ मध्ये आलेल्या 'बरसात' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलेलं, ज्यामध्ये त्याच्यासह करिश्मा कपूर झळकणार होती; परंतु तिने या चित्रपटात काम करण्यास नकार दिलेला. याबद्दल आता अभिनेत्याने सांगितलं आहे.

बॉबी देओलने एका मुलाखतीत त्याच्या पहिल्या चित्रपटाबद्दल सांगितलं आहे. 'बरसात'मध्ये त्याच्याबरोबर ट्विंकल खन्ना झळकलेली. परंतु, ट्विंकल नाही तर करिश्मा कपूरला या चित्रपटासाठी पहिली पसंती होती. मात्र, करिश्माने या चित्रपटात काम करण्यासाठी नकार दिलेला. याबद्दल बॉबी देओल म्हणाला, खरंतर या चित्रपटासाठी करिश्मा कपूरला पहिली पसंती होती. पण, त्यावेळी चित्रपटाची कथा पूर्णपणे तयार झाली नव्हती आणि त्यावेळी स्त्रिया दीर्घकाळ चित्रपटांत काम करू शकत नाही अशी परिस्थिती होती, जी सुदैवानं आता बदलली आहे. करिश्माबद्दल बॉबी देओल पुढे म्हणाला, यामुळे या चित्रपटात काम करण्याबद्दल करिश्माच्या मनात शंका होती आणि त्यासाठी मी तिला अजिबात दोष देत नाही. तिने 'प्रेम कैदी' या सिनेमातून तिच्या करिअरची सुरुवात केली. ट्विंकलबद्दल अभिनेता म्हणाला, मला असं वाटतं, ट्विंकल व मी एकाच चित्रपटातून पदार्पण करणं हे आमच्या नशिबात लिहिलेलं होतं. इंडस्ट्रीत काम न करणं हा पूर्णपणे तिचा निर्णय होता. तिला इथे काम करायला अजिबात आवडायचं नाही. ट्विंकलबद्दल बॉबी देओल पुढे म्हणाला, ती खूप निर्भीड आहे. तिचा एक ऑरा होता, जो आजही पाहायला मिळतो. ती स्वतःच्या बुद्धीचा वापर करायची, त्यामुळेच आज ती लेखिक झाली आहे. पुढे बॉबी देओलला चित्रपटादरम्यानच्या आठवणींबद्दल विचारल्यानंतर तो म्हणाला, माझ्या खूप आठवणी आहेत. मुहूर्ताचा शॉट माझ्या वाढदिवसाच्या दिवशी २७ जानेवारीला झालेला, त्यावेळी मी २२-२३ वर्षांचा होतो. दरम्यान, 'बरसात'नंतर बॉबी देओलने 'गुप्त', 'करीब', 'बादल', 'हम तो मोहोब्बत केरेंगे', 'अजनबी', 'हमराझ' यांसारख्या अनेक चित्रपटांत काम केलं. अलीकडे तो चर्चेत आला ते 'ॲनिमल' या चित्रपटामुळे, तर सध्या तो आर्यन खानच्या 'बॅड्स ऑफ बॉलीवूड'मधील भूमिकेमुळे चर्चेत आहे



# सोनम कपूर करणार कमबॅक

अभिनेत्री सोनम कपूरने अल्पावधीत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. मात्र मुलगा वायू याच्या जन्मानंतर मातृत्वाचा आनंद अनुभवण्यासाठी तिने सिनेसृष्टीपासून काही काळ दूर राहण्यास पसंती दिली. मात्र आता पुन्हा एकदा ती कमबॅक करण्यास सज्ज झाली आहे. आता ती 'बॅटल ऑफ बिटोरा' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. तिची बहीण रिया कपूरच या चित्रपटाची निर्मिती करत आहे. सोनमने अलीकडेच एका मुलाखतीत बॉलिवूडमध्ये कमबॅक करायचे असल्याचे सांगितले होते. पण सिनेमात फक्त दिसायचं म्हणून तिला काम करायचं नाही. तर कथा ज्या महिला केंद्रित आहेत आणि ज्या प्रेक्षकांना चांगला संदेश देतील, अशा चित्रपटांमध्ये तिला काम करायचे आहे. ब्रेकनंतर सोनम तिच्या आगामी चित्रपटाचं शूटिंग २०२५ च्या अखेरीस सुरु करण्याची शक्यता आहे. या चित्रपटाद्वारे ती पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर एका नव्या भूमिकेत येणार आहे. सोनमच्या वर्क फ्रंटबाबत सांगायचे झाल्यास, ती शेवटची ब्लाइंड चित्रपटात दिसली होती. हा चित्रपट ७ जुलै २०२३ रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म जिओ सिनेमावर प्रदर्शित झाला. २०१९ मध्ये 'एक लडकी को देखा तो ऐसा लगा' मध्ये सोनम तिचे वडील अनिल कपूरसोबत दिसली होती. त्यात राजकुमार रावही होता. त्याच वर्षी सोनम 'द झोया फॅक्टर' या चित्रपटातही दिसली होती. सोनमने २०१८ मध्ये आनंद आहुजासोबत लग्न केले आणि २०२२ मध्ये तिचा मुलगा 'वायू'चा जन्म झाला. मुलाला वेळ देण्यासाठी तिने चित्रपटांमधून ब्रेक घेतला होता. मात्र फॅशन विश्वात ती खूप सक्रिय होती. ती अलीकडच्या काळात अनेक फॅशन इव्हेंट्समध्ये सहभागी झाली होती.

# कन्नड इंडस्ट्रीने बॅन केल्याबद्दल रश्मिका म्हणाली...



अभिनेत्री दक्षिण सिनेसृष्टीसह बॉलीवूड इंडस्ट्रीतही आपल्या अभिनयामुळे कायमच चर्चेत राहणारी अभिनेत्री म्हणजे रश्मिका मंदाना. गेल्या काही दिवसांपासून तर रश्मिकाच्या नावाच्या चर्चा अधिकच होत आहेत. याचं कारण म्हणजे रश्मिकाचा विजय देवरकोंडाबरोबर झालेला साखरपुडा आणि तिचा आगामी सिनेमा 'थम्मा.' रश्मिका मंदानाबाबत झालेल्या चर्चांमध्ये तिला कन्नड इंडस्ट्रीमधून बॅन करण्यात आल्याचीही जोरदार चर्चा झाली होती. रश्मिकाला कन्नड इंडस्ट्रीने बॅन केल्याची अफवा मध्यंतरी पसरली होती, ज्याबद्दल आता तिने मौन सोडलं आहे. याबाबत रश्मिका म्हणते, बाहेरच्या जगात नेमकं काय चाललंय? ते कुणालाच माहीत नसतं. आम्ही प्रत्येक गोष्ट शेअर करत नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्यात काय घडतंय? ते फक्त देवालाच माहिती असतं. त्यामुळे लोक कोणाबद्दल काय बोलतात याला फारसा अर्थ नसतो. मात्र, ते आमच्या कामाबद्दल काही बोलत असतील तर आम्ही ते ऐकू. त्याबद्दल विचार करू आणि त्यावर काम करू. यापुढे तिनं स्पष्ट केलं की, लोक काय विचार करतात, त्यावर एखादा कलाकार आपलं आयुष्य किंवा त्याचं काम ठरवू शकत नाही. इतरांच्या मतांनुसार कोणीही आपलं जीवन जगू शकत नाही. रश्मिकाला कन्नड इंडस्ट्रीने बॅन केल्याबद्दल विचारलं. त्याबाबत अभिनेत्री मोजक्या शब्दांत असं म्हणाली, अजूनपर्यंत तरी कुणी मला बॅन केलेलं नाही. तसंच यावेळी तिला ऋषभ शेट्टीच्या 'कांतारा'बद्दलही प्रश्न विचारण्यात आला. यावर तिनं उत्तर देत म्हटलं, हो पाहिला ना, झालं असं की चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पहिले २-३ दिवस मी तो पाहू शकले नाही. पण नुकताच मी हा चित्रपट पाहिला आणि चित्रपटाच्या टीमला मेसेजही केला. त्यावर त्यांनीही मला धन्यवाद असं उत्तर दिलं. दरम्यान, रश्मिका सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. विजय देवरकोंडाबरोबर साखरपुडा झाल्याच्या बातम्या सध्या सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. यावर दोघांनीही अधिकृत वक्तव्य केलं नाही, पण विजयच्या टीमने हे कबूल केलं आहे की, दोघं फेब्रुवारी २०२६ मध्ये विवाहबंधनात अडकणार आहेत. रश्मिकाच्या कामाबद्दल सांगायचं झाल्यास, ती लवकरच 'थम्मा' या चित्रपटात झळकणार आहे. या रोमँटिक हॉरर-कॉमेडी चित्रपटात तिच्यासह अभिनेता आयुष्मान खुरानाही मुख्य भूमिकेत आहे.

# ...यामुळे 'कांतारा चॅप्टर १' बनला ब्लॉकबस्टर




'कांतारा अ लिजेंड चॅप्टर १' रिलीज होताच केवळ बॉक्स ऑफिसवरच नाही, तर प्रेक्षकांच्या मनावरही राज्य करत आहे. 'कांतारा चॅप्टर १'ला 'कांतारा' पेक्षाही जास्ती पसंती मिळत आहे. हा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झालेल्या 'कांतारा'चा प्रीक्वल आहे आणि यातील प्रत्येक सीन इतका दमदार आहे की लोक त्याचे कौतुक करताना थकत नाहीत. चित्रपटाची कथा, पात्रे आणि व्हीएफएक्स खूपच उत्कृष्ट पद्धतीने पडद्यावर मांडले गेले आहेत. याच कारणामुळे चित्रपट यशाच्या शिखरावर पोहोचत आहे. 'कांतारा चॅप्टर १'ने आपले बजेट वसूल केले आहे आणि आता तो केवळ नफ्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ऋषभ शेट्टीने नुकत्याच एका कार्यक्रमात चर्चा केली. त्याने 'कांतारा चॅप्टर १'च्या यशामागचे सीक्रेट सांगितले. तो म्हणाला की, मागील भागापासून ते या भागापर्यंत, आम्ही चित्रपटाला अधिक दृश्यात्मक रूप दिले आहे. मी आधीही म्हटले आहे की, आम्ही जितके जास्त प्रादेशिक होऊ, तितकेच जास्त जागतिक बनू आणि अगदी तसेच घडले आहे. 'कांतारा चॅप्टर १'च्या सक्सेस इव्हेंटमध्ये ऋषभ म्हणाला की, हा चित्रपट आणि हे पात्र माझे स्वप्न होते, जे माझ्या टीमने आपले मानले आणि आता हे जनतेचे स्वप्न बनले आहे. माझी ऊर्जा प्रेक्षकांमध्ये हस्तांतरित झाली आहे. 'कांतारा चॅप्टर १' सध्या देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करत आहे. सुमारे ६१ कोटी रुपयांनी खातं उघडणाऱ्या या चित्रपटाने केवळ सात दिवसांत भारतात ३१६ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. विकेंड नसता नाही, चित्रपटाचे कलेक्शन २५ कोटी रुपये होते. यापूर्वी चित्रपटाने सुमारे ३५ कोटी कमावले होते. आता विकेंडला कमाईत आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# खरं प्रेम काय असते, हे कोणीच सांगितले नाही!

अभिनेत्री समंथा रुथ प्रभू सोशल मीडियावर नेहमीच तिचे आयुष्य, आगामी प्रोजेक्ट आणि जाहिरातींशी संबंधित माहिती शेअर करत असते. नुकतेच अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्रामवर तीस वर्षांची महिला असण्याबद्दलचे अनेक विचार व्यक्त केले. तिचे तीस आणि विशीतील आयुष्य किती वेगळे आहे हे तिने सांगितले. तसेच, तिला 'खरे प्रेम' मिळाल्याबद्दलही तिने भाष्य केले. अभिनेत्री समंथा रुथ प्रभूने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती खूप छान दिसत आहे. समंथाने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, मी आणि अवनी रांभिया काल बोलत होतो आणि त्यामुळे मला एक गोष्ट विचार करायला भाग पाडली की... यासह तिने एक खूप मोठी कविता शेअर केली आहे, ज्यामध्ये तिने तिच्या विशीच्या वयाची तुलना तिशीच्या वयाशी केली आहे. समंथाने सांगितले की, जसजसे तुमचे वय वाढते, तसतसे प्रत्येकजण तुम्हाला पुढे काय होईल हे सांगण्याचा प्रयत्न करतो. 'तुमचा ग्लो (तेज) कमी होईल, सौंदर्य कमी होईल,' असे लोक सांगतात. पण, खरं प्रेम काय असतो हे कोणीच सांगितले नाही. ते मला जशी मी आहे तशीच शोधून काढेल. मला स्वतःला बदलावं लागणार नाही. समंथा रुथ प्रभूचे पहिले लग्न अभिनेता नागा चैतन्य याच्याशी झाले होते. दोघांनी २०१५ मध्ये डेटिंगला सुरुवात केली. ६ ऑक्टोबर २०१७ रोजी गोव्यात त्यांनी ख्रिश्चन पद्धतीने आणि दुसऱ्या दिवशी हिंदू पद्धतीने विवाह केला. ऑक्टोबर २०२१ मध्ये त्यांनी वेगळे होण्याची घोषणा केली आणि त्याच्या पुढील वर्षी त्यांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर नागा चैतन्यने ४ डिसेंबर २०२४ रोजी अन्नपूर्णा स्टुडिओमध्ये शोभिता हिच्याशी लग्न केले. तर, समंथा सध्या राज निदिमोरुला डेट करत असल्याच्या चर्चा आहे. समंथाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, अभिनेत्री समंथा रुथ प्रभू सध्या राज आणि डीके यांच्यासोबत 'रक्त ब्रह्मांड: द ब्लडी किंगडम' या सीरिजवर काम करत आहे. या सीरिजमध्ये समांथासोबत आदित्य रॉय कपूर, अली फजल, वामिका गब्बी आणि जयदीप अहलावत हे कलाकार देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. ही सीरिज २०२६ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.



# म्हणून मानसी इतकी वर्षं चित्रपटांपासून दूर!




अभिनेत्री मानसी नाईक ही तिच्या अभिनय, तसेच नृत्यासाठी ओळखली जाते. मात्र, अनेक वर्षे ती चित्रपटांत काम करताना दिसली नव्हती. आता लवकरच ती 'सकाळ तर होऊ द्या' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'सकाळ तर होऊ द्या' या चित्रपटात मानसीबरोबर अभिनेता सुबोध भावे प्रमुख भूमिकेत आहे. आता मानसीने एका मुलाखतीत ती इतकी वर्षे चित्रपटांत का दिसली नाही, यावर वक्तव्य केले आहे. या मुलाखतीत तिला विचारले गेले की, तू इतकी वर्षे चित्रपटांत काम का केलं नाहीस? मानसी म्हणाली, असं अजिबात नाही. मी कधीच कुठल्याही कामाला लहान- मोठं समजत नाही. मी काम करते. मग ते कोणत्याही रूपात असो. मानसी पुढे म्हणाली, चित्रपट आले नाहीत, असं नाही. चित्रपटासाठी मला विचारणा झाली. जेव्हा मी पदार्पण केलं, तेव्हाही मी चित्रपटातून पदार्पण केलं होतं. मग मालिका केली. नंतर माझं काम सुरू झालं. सध्या ज्या पद्धतीचे सिनेमे मराठीमध्ये बनत आहेत, ते पाहिल्यानंतर मी काहीतरी गमावलं, असं मला अजिबात वाटत नाही. मराठी इंडस्ट्री कंटेंटसाठी ओळखली जाते. कंटेंट हा हीरो असतो. मला काम करायचं होतं की, मला अभिनय करायचा होता, हा फरक आहे. मला अभिनय निवडायचा होता. आपण चित्रपटात दिसतोय, आपण चित्रपट केला, तो प्रोफाइलमध्ये दिसणार, मला असं काम करायचं नाही आणि यापुढेसुद्धा मी तसं कधीच करणार नाही. मानसी असेही म्हणाली, मला तसा चित्रपट किंवा कंटेंट मिळाला असता, तर मी नक्कीच काम केलं असतं. जे मला मिळालं नाही, त्याचा मला काही पश्चात्ताप वाटत नाही. तर, मला कळलं की, काम करताना नेटवर्किंग खूप महत्त्वाचं आहे. त्या नेटवर्किंगमध्ये कोणीतरी तुमच्यासाठी बोलणारं पाहिजे. हा ब्रेक घेतल्यानंतर चित्रपटात दोन पात्री काम करणं ही माझ्यासाठी परीक्षा होती.

# गश्मीर महाजनीचा आगामी चित्रपट येणार

अभिनेता गश्मीर महाजनी हा त्याच्या एकापेक्षा एक भूमिकांसाठी ओळखला जातो. 'देऊळ बंद' या मराठी सिनेमापासून ते 'इमली' या हिंदी मालिकेतील त्याच्या भूमिकेपर्यंत त्याच्या सर्व भूमिकांना प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळताना दिसते. त्याच्या 'फुलवंती' या सिनेमातील गश्मीरच्या भूमिकेचे प्रचंड कौतुक झाले. आता प्रेक्षकांना तो पुन्हा कधी पडद्यावर दिसणार, याची उत्सुकता लागलेली आहे. गश्मीर महाजनी अनेकदा सोशल मीडियावर आस्क Je या सेशनमध्ये चाहत्यांबरोबर गप्पा मारतो. चाहते त्याला अनेक प्रश्न विचारतात. त्याच्या खासगी आयुष्यापासून ते त्याच्या करिअर, त्याच्या भूमिका, आगामी काळातील चित्रपट अशा अनेक विषयांवर चाहते त्याला प्रश्न विचारतात. इतकेच नाही, तर अनेकदा चाहते त्याला त्याच्या आयुष्यातील काही अडचणींबाबत सल्ले विचारतानादेखील दिसतात. आता नुकताच गश्मीरला एका चाहत्याने विचारले की, तुझा पुढचा मराठी चित्रपट कधी येणार आहे? त्यावर गश्मीरने उत्तर दिले की, माझ्या पुढच्या मराठी चित्रपटाचे शूटिंग डिसेंबर आणि जानेवारीमध्ये होणार आहे. पुढच्या वर्षी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. आणखी एका चाहत्याने विचारले की, तू आणखी चित्रपट का करीत नाहीस? तू सतत दिसत राहा. आम्हा प्रेक्षकांना तू सतत दिसला पाहिजेस. त्यावर गश्मीर म्हणाला, चांगला चित्रपट करू की मग सतत दिसत राहू? तुम्ही सांगा. एक चाहता गश्मीरला म्हणाला की, तू तुझ्या चाहत्यांना विसरला आहेस. त्यावर गश्मीरने उत्तर देत लिहिले, नाही. मी माझ्या चाहत्यांना विसरलेलो नाही. मी माझ्या चाहत्यांसाठी काहीतरी खास बनवत आहे. सोशल मीडियावर रोज बिनअर्थाच्या पोस्ट बघण्यापेक्षा चित्रपटगृहात तुम्ही माझा चित्रपट पाहा. चाहते गश्मीरला अनेकविध प्रश्न विचारताना दिसतात आणि गश्मीरदेखील त्याची उत्तरे देत असतो. आता गश्मीर कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, चित्रपटाचे नाव काय असणार आणि चित्रपटात त्याच्याबरोबर कोणते कलाकार दिसणार हे पाहणे महत्त्वाचे आहे. गश्मीर महाजनी काही वेब सीरिजमध्येदेखील दिसला आहे. तसेच, तो खतरों के खिलाडी या रिॲलिटी शोमध्येदेखील स्पर्धक म्हणून दिसला होता. त्या शोमध्ये त्याने ज्या पद्धतीने स्टंट केले, त्यामुळे त्याने चाहत्यांची मने जिंकली होती. आता गश्मीरला नवीन भूमिकेत पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.



# श्रेयसचा 'मर्दिनी' लवकरच भेटीला



अभिनेता श्रेयस तळपदे आणि फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. सादर करीत आहेत अशी कथा जी केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला, तिच्या सहनशीलतेला आणि तिच्या अदम्य धैर्याला उजाळा देणारी आहे. काळ कितीही बदलला, असुरांचे कितीही सावट पसरले, तरीही इतिहासाने वेळोवेळी दाखवून दिले आहे की एका मर्दिनीचे धैर्य, तिची जिद्द आणि तिचा प्रखर संकल्प हाच अन्याय, दुष्टता आणि अंधार यांवर मात करण्यासाठी पुरेसा ठरतो. दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर या चित्रपटाची नांदी संपन्न झाली. निर्माते श्रेयस तळपदे यांनी यावेळी सांगितले प्रेक्षकांना नेहमीच काहीतरी वेगळं देण्याची परंपरा फ्लुएन्स मोशन पिक्चर्स ने कायम ठेवली आहे. पोस्टर बॉईज, बाजी आणि सनई चौघडे यांसारख्या अनेक चित्रपटांमधून मिळालेलं प्रेक्षकांचं अपार प्रेम या बॅनरच्या नावाला अधिकच उजाळा देतं. गुणवंतांना सदैव प्राधान्य देणाऱ्या या बॅनरने सई ताम्हणकर, तृप्ती डिंमरी, अनिता दाते यांसारख्या अनेक कलाकारांना तसेच कॅमेरामॅन आणि दिग्दर्शकांना प्रकाशझोतात आणलं आहे. आता 'मर्दिनी' या सिनेमाच्या निमित्ताने अजय मयेकर दिग्दर्शक म्हणून पहिल्यांदाच या नव्या प्रवासाला सुरुवात करणार आहेत. हा त्यांचा पहिला दिग्दर्शकीय चित्रपट ठरणार आहे. लवकरच या चित्रपटाचं चित्रिकरण सुरु होणार आहे. 'मर्दिनी' हा केवळ एक चित्रपट नसून प्रत्येक स्त्रीमध्ये दडलेल्या अंतर्गत शक्तीला साजरा करणारा एक उत्सव आहे. आशा आहे कि या सिनेमाला सुद्धा प्रेक्षक प्रेम देतील. चित्रपटाबद्दलची संपूर्ण माहिती, कलाकारांची निवड आणि इतर तपशील लवकरच जाहीर केले जातील. श्रेयस तळपदे आणि फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. ची भव्य निर्मिती असलेला हा चित्रपट २०२६ साली प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.



# वाढत्या वयावर चित्रांगदा बोलली!

बॉलीवूडमधील कलाकारांचे वाढते वय हा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे. सिनेमांमध्ये पुरुष कलाकार त्यांच्यापेक्षा वयाने खूपच लहान असलेल्या अभिनेत्रीसोबत रोमाँस करताना दिसतात. या सगळ्यात महिला कलाकारांना आपले वाढते वय यामुळे इंडस्ट्रीत काम करताना दबाव येता का? यावर अभिनेत्री चित्रांगदा सिंह हिने भाष्य करत आपले परखड मत व्यक्त केले आहे. महिला कलाकारांनी खरोखरच तरुण दिसणे अपेक्षित आहे का? याबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली, 'हे सर्वांसाठी आहे.' जर तुम्ही ७० वर्षांच्या महिलेची भूमिका करत असाल तर तुम्ही तिच्यासारखे दिसले पाहिजे. जर तुम्हाला ३० वर्षांच्या महिलेची भूमिका करायची असेल तर तुम्हाला ती कशी करायची हे माहित असले पाहिजे. पुढे अभिनेत्री म्हणाली, पुरुष कलाकारालाही हीच गोष्ट लागू होते. याचे उदाहरण देताना चित्रांगदाने बॉलीवूडचा खिलाडी कुमारचे उदाहरण दिले. अक्षी त्याच्या फिटनेसवर त्याच्या डाएटवर लक्ष केंद्रित करतो, असे अभिनेत्रीने सांगितले. तसेच अभिनेत्री करिना कपूर आणि विद्या बालन यांच्या कामाचे कौतुक अभिनेत्रीने केले. काळ खूप बदलला आहे. करीना अद्भुत काम करत आहे. विद्या खूप काम करत आहे. सर्व कलाकार अजूनही इंडस्ट्रीत टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील असतात. एका विशिष्ट पद्धतीने दिसण्याच्या दबावाबद्दल निकोल किडमन, डेमी मूर यांना पहा, प्रत्येकजण प्रयत्न करत आहे. तुम्हालाही प्रयत्न करावे लागतील. अर्थात, कलाकारांना प्रत्येक गोष्टीत दबावाचा सामना करावा लागतो. असेही चित्रांगदाने सांगितले. लवकरच चित्रांगदा सिंह बॅटल ऑफ गलवान सिनेमात सलमान खानसोबत दिसणार आहे. हा सिनेमा पुढील वर्षाच्या सुरुवातीला प्रदर्शित होऊ शकतो, अशी माहिती आहे. अद्याप सलमानव्यतिरिक्त इतर कलाकारांची नावे रिव्हील करण्यात आलेली नाहीत.



# चित्रपटसृष्टीतली मैत्री फक्त दिखावा

चित्रपट निर्माता व दिग्दर्शक करण जोहर यांनी अलीकडेच हिंदी चित्रपटसृष्टीतील मैत्री आणि नातेसंबंधांबाबत धक्कादायक खुलासे केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, इंडस्ट्रीमध्ये बहुतेक कलाकारांची मैत्री फक्त पाट्यापुरतीच मर्यादित असते, काम आणि पैशांच्या बाबतीत सर्वजण स्वतःचा फायदा पाहतात. मात्र, या सगळ्या परिस्थितीत त्यांनी एकाच व्यक्तीला अपवाद ठरवले ते म्हणजे शाहरुख खान.

करण जोहर यांनी दिलेल्या मुलाखतीत सांगितले, चित्रपटसृष्टीत मैत्रीचा अर्थ फक्त पार्टीपर्यंतच आहे. काम आणि पैशांच्या बाबतीत कोणीही कुणासाठी तडजोड करत नाही. कोणताही अभिनेता असं म्हणत नाही की 'माझ्या मागच्या दोन चित्रपटांनी नुकसान झालं, म्हणून मी निर्माता म्हणून तुझे पैसे परत देतो.' सर्व जण फक्त स्वतःचा फायदा पाहतात. अभिनेते पाट्यांमध्ये अतिशय छान आणि प्रेमळ असतात, पण ते काम करताना केवळ व्यावसायिक हेतूनेच वागतात. माझ्यासाठीही ही इंडस्ट्री व्यवसायासाठी आहे, दानधर्मासाठी नाही. करण जोहर यांनी स्पष्ट केलं की इंडस्ट्रीतल्या अनेक कलाकारांनी अगदी ज्यांना त्यांनी स्वतः लाँच केलं त्या लोकांनीही कधीच नुकसानाची जबाबदारी घेतली नाही. प्रत्येकजण आपली फी घेऊन काम करतो. पण जर चित्रपट अपयशी ठरला, तर कुणीही तोटा वाटून घेण्यास तयार नसतो, असे करण म्हणाले. करण जोहर यांनी शाहरुख खानसोबतच्या नात्याबद्दल विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, शाहरुख खान हे या सगळ्या गोष्टींमध्ये एकमेव अपवाद आहेत. मी त्यांना मित्र, सहकारी, भाऊ आणि माणूस म्हणून खूप मानतो. त्यांनी कधीही माझ्याशी किंवा माझ्या वडिलांशी पैशांबाबत चर्चा केली नाही. ते नेहमी म्हणायचे, 'कागद पाठव, मी साइन करतो.' मी जेव्हा दिग्दर्शक म्हणून शाहरुखशी बोलतो, तेव्हा ते स्क्रिप्टसुद्धा विचारत नाहीत. मला फक्त सांगायचं असतं की मी एक चित्रपट करत आहे आणि मला या तारखा हव्या आहेत. आमच्यात कधीच पैशाचा विषय आला नाही. त्यांच्या व्यतिरिक्त प्रत्येक कलाकारासोबत माझं नातं पूर्णतः व्यावसायिक आहे, आणि मला त्यात काहीच अडचण नाही. करण जोहर यांच्यावर नेहमी नेपोटिझम म्हणजेच घराणेशाहीचा आरोप केला जातो. मात्र त्यांनी सांगितले की, मी कोणत्याही गटाचा भाग नाही, आणि कोणाचं करिअर मोडणं किंवा बनवणं माझा उद्देश नाही. मी काम करतो कारण मला चित्रपट बनवणं आवडतं.


# मॅडॉक फिल्म्समध्ये परतली नोरा फतेही



सुपरस्ट मॅडॉक फिल्म्सने आगामी थामा चित्रपटातील दिलबर की आंखों का हे नवीन गाणे प्रदर्शित केले. या गाण्याच्या रिलीजमुळे हे स्पष्ट होते की नोरा फतेही आता मॅडॉक हॉरर चित्रपटात सामील झाली आहे. गाण्यासोबत, निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, दिवाळी आता आणखी गरम झाली आहे. Dilbar Kian khon Ka येथे आहे, आणि norafatehi डान्स फ्लोअरला आग लावण्यासाठी परत आली आहे. २१ ऑक्टोबर रोजी, Thamma जगभरातील चित्रपटगृहांमध्ये एक रक्तरंजित प्रेमकथा घेऊन येत आहे. 'थामा' चित्रपटातील 'दिलबर की आंखों का' या चित्रपटाचे शीर्षक गीत 'तुम मेरे ना हुए' प्रदर्शित होण्यापूर्वी प्रदर्शित झाले होते. या गाण्यात रश्मिका मंदानाने एक जबरदस्त नृत्य सादर केले होते. या गाण्यात रश्मिकासोबत आयुष्मान खुरानाही दिसला होता. हे गाणे प्रेक्षकांना खूप आवडले. नोरा फतेहीच्या अद्भुत डान्स मूव्हजवर अनेक चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका चाहत्याने लिहिले, अरे देवा, ती पुन्हा एकदा खरोखरच आगीत आहे! दुसऱ्या चाहत्याने लिहिले, राणी परत आली आहे! तर काहींनी नोराच्या डान्सची तुलना तमन्ना भाटियाच्या डान्सशी केली. दुसऱ्या चाहत्याने लिहिले, उत्साहजनक! दुसऱ्या चाहत्याने लिहिले, नोराचे प्रत्येक पाऊल आगीत आहे. 'थामा' हा चित्रपट एक रोमँटिक कॉमेडी हॉरर लव्ह स्टोरी आहे. त्याचे दिग्दर्शन आदित्य सरपोतदार यांनी केले आहे. मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्समधील हा पाचवा भाग आहे. आयुष्मान खुराना, रश्मिका मंदान्ना, नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट २१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळीच्या मुहूर्तावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## मंगलमय ही प्रभात...

# चित्रपटसृष्टीला विदर्भाचे योगदानः केशवराव भोळे



'दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव जगताचे हे सुरेल अंगण खेळ खेळूया सारे आपण रंक आणिक राव याला जीवन ऐसे नाव' जीवनाचा खरा अर्थ प्रस्तुत करणारे हे उद्बोधनात्मक गीत बोलपटाच्या पहिल्या पिढीतील कविश्रेष्ठ शांतारामआठवले यांनी १९४३ सालच्या प्रभात कंपनीच्या 'रामशास्त्री' चित्रपटासाठी लिहिले. घरात बिट्ट्या खेळताना एक परकरी मुलगी व तिच्याच वयाच्या मुलावर चित्रित झालेले गीत मंजू व अनंत मराठे यांनी बालसुलभ स्वरात गायले व संगीत शिरोमणी केशवराव भोळे यांनी संगीतबद्ध केले. खालील दोन खुसखुशीत गाणीही त्यातलीच होती.

हसून बोलना रुसू नकोना। कधी दयामाया कशी तुला येईना. सुकुमार माझा राम वनी जाई चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीचे कलाकार कितीही सिंहावलोकन केले तरी दृष्टीस पडत नाही. कारण त्या हिर्यांची चमक झाकोळली आहे. त्यांच्या वरील विस्मृतीची धूळ झटकून चकाकी आणण्याचा हा खटाटोप. विदर्भाने चित्रपटसृष्टीला बहाल केलेले संगीतकार केशवराव भोळे हे अशातलेच! चित्रमहर्षी व्ही. शांताराम व मंडळींनी प्रभात कंपनीचा पहिला मराठी बोलपट १९३२ साली काढण्याचा मान मिळविल्यावर गुणवंत कलाकारांच्या शोधात ते होते. 'एकलेपणाची आग लागली हृदयात...' १९३३ साली भोळे यांनी 'नाट्य मन्वंतर' नावाची संगीत नाट्य संस्था स्थापन करून 'आंधळ्यांची शाळा' हे नाटक पडद्यावर आणले. वरील गीत त्यातलेच आहे. त्यातील गायकांनी गायलेल्या स्वराला जो चपखल संगीताचा पोशाख चढवून केशवरावांनी संगीताची मांडणी केली होती, तो प्रकार व्ही. शांताराम यांच्या पारखी नजरेने टिपला. अशारीतीने केशवरावांची प्रभातच्या रत्नावळीत निवड झाली. त्यांना लगेच प्रभातने 'अमृतमंथन' चित्रपटाचे संगीत दिले. तो संगीत नाटकाचा काळ असूनही केशवरावाच्या संगीताने चित्रपट संगीताला दर्जा प्राप्त करून दिला.

पुढे १९३४ ते १९५१ पर्यंत प्रभातच्या तब्बल ९ हिंदी व मराठी चित्रपटांना संगीत देऊन पूर्णत्वास उतरले. आजच्या काळात जवळ जवळ सर्वच तत्कालीन कलाकार काळाच्या पडद्याआड गेले असतील. उरल्या फक्त इतिहासाच्या पानावर उमटलेल्या काही आठवणी. केशवरावांच्या संगीताने मोहिनी घातलेल्या काही चित्रपटातील गाण्यांना शरण जाऊ. 'संजीवनी वनी वनी विहरत मन रमवाया वनी मंगलमय ही प्रभात' 'शुभ सदा मोद मज भुबाला ऋतु वसंत आला' १९३४ सालच्या प्रभातच्या 'अमृतमंथन' (मराठी) सिनेमातील केशवराव यांच्या आतषबाजीने प्रभातची 'मंगलमय ही प्रभात' ही 'सिग्नेचर ट्यून' सार्थ ठरली. त्याचप्रमाणे 'अमृतमंथन'च्या हिंदीतील गाणीही भारतभर प्रसिद्ध झाली.

(१) रात आई है नया रंग जमाने के लिये (२) कमसिनी मे दिल पे गम का बार क्यो शांताबाई आपटे यांच्या स्वरात गाऊन घेतलेली ही रंगतदार गाणी होती. ज्या काळात हिंदी चित्रपटातील गाण्याचा लेहजा व दर्जा ही स्थापित झाला नव्हता त्या काळात केशवरावांनी हे काम केले. 'आधी बीज एकले बीज अंकुरले रोप वाढीले एका बीजा पोटी तरु कोटी कोटी पोटी जन्म घेती सुमने बरी... ' १९३६ सालच्या प्रभातच्या 'संत तुकाराम' चित्रपटातील या अभंगसदृश गाण्याला वेगळ्याच उंचीवर पोहोचविले. आस्तिक किंवा नास्तिक कुणीही या गाण्याच्या शब्दावर, गायकीवर व संगीतावर आजही तल्लीन होतात.


'अशाप्रकारे प्रभातचे सर्वच चित्रपट मराठी व हिंदी भोळे यांच्या संगिताने न्हावून निघाले. हिंदी व मराठी सिनेसंगीत व मराठी भावगीतांचे जनक अशी बिरूदावली लाभलेले केशव वामन भोळे यांचा जन्म २३ मे १८९६ रोजी विदर्भभूमी अमरावतीत भोळे वाड्यात सधन व मोठ्या एकत्र कुटुंबात झाला. वडील सतार वाजवायचे, पण केशवरावांच्या जन्माआधीच वडिलांचे निधन झाले. पण त्यांच्या जनुकात संगीताचे बीज पेरले गेले. वर्हाड प्रांतात मोठमोठ्या नाटक कंपन्या, नाट्य-सिने कलावंत, कीर्तनकार, प्रवचनकार दौर्यावर आल्यास भोळे वाड्यात मुक्काम असायचा. संगीताच्या तालमी वाड्यात व्हायच्या.

बालपणापासूनच केशवरावांना त्या प्रत्यक्ष ऐकावयास व पहावयास मिळायच्या. त्यातून संगीताचे वेड लागले. मोठमोठ्या गायकांकडून संगीतातील चिजा ते घरीच शिकले. रीतसर कुण्या उस्तादांचा गंडा न बांधता ते गायक व संगीतकार बनले. त्यांना क्रिकेटची आवड होती व डॉक्टरही व्हायचे होते म्हणून मुंबई गाठली व वैद्यकीय शिक्षण सुरू केले. क्रिकेटचा मोसम आल्यावर कंकय्या नायडूचे क्रिकेट व नाटकाच्या मोसमात बाल गंधर्वांची नाटके व त्यांनी गायलेली गाणी त्यांना स्वस्थ बसू देईना. अभ्यासात व्यत्यय यायचा. अखेरीस वैद्यकी की गायकी यातून त्यांनी गायकी निवडली. १९२६ साली पुण्यात येऊन पूर्ण वेळ संगीत व गायकीस देऊन आपली संगीत कारकीर्द सुरू केली. ना. सी. फडके यांनी १९३१ साली लिहिलेल्या 'युगांतर' या संगीत नाटकातील संगीताची धुरा सांभाळताना त्यांनी प्रत्यक्ष गानहिरा हिराबाई बडोदेकरसाठी खालील गाणे बसविले. हा मोठा बहुमान होता. हे गाणे नाटकाची ओळख ठरले.

चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान मिळूनही त्यांचे पाय जमिनीवर होते. पंजाबहून आलेले हिंदीतील दिग्गज गुलाम हैदर यांच्या 'रावी के ऊस पार सजनवा' या पहाडी रागातील गाण्याने प्रभावित झाले व आपले संपूर्ण संगीत या गाण्यावरून ओवाळून टाकावे असे म्हणाले. ' काळ बदलत गेला, जुनी संगीतकारिका कालबद्ध झाली, स्वरूप बदलले. मूकमनाने केशवराव अवलोकन करीत होते. ऑल इंडिया रेडिओत लाईट म्युझिक विभागात अधिकारी पदावर नियुक्त झाले. सुमन कल्याणपूर यांना पार्श्वगायनाचे धडे दिलेत. हिंदी व मराठी पार्श्वगायनाचे प्रणेते केशवराव भोळे यांनी काही ठिकाणचा उल्लेख १९६७ साली, पण श्रीकांत जोशी यांच्या माहितीनुसार ९ नोव्हेंबर १९७७ रोजी सुरेल जीवन प्रवासाची अखेरची नोंद केली. त्यांनी निर्माण केलेल्या स्वरांची गोडी व चित्रपट संगीतातील अभिनव प्रयोग आजही रसिक विसरले नाहीत.

**रमेश पोफळी**

# सैफला अमृताने खूप गोष्टी शिकवल्या



अभिनेता अभिनेता सैफ अली खान हा 'हम तुम', 'दिल चाहता है', 'रेस', 'रंगून' अशा अनेक लोकप्रिय चित्रपटांसाठी ओळखला जातो. आजही तो विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन करत असतो. अभिनेत्याच्या खासगी आयुष्याबाबत बोलायचे तर १९९१ मध्ये त्याने बॉलीवूड अभिनेत्री अमृता सिंह बरोबर लग्नगाठ बांधली होती. मात्र, त्यांचे हे नाते फार काळ टिकू शकले नाही. त्यांनी २००४ मध्ये घटस्फोट घेतला. त्यानंतर सैफ अली खानने २०१२ मध्ये अभिनेत्री करिना कपूरबरोबर लग्नगाठ बांधली. आता सारा व इब्राहिम हे बॉलीवूडमध्ये काम करत असल्याचे पाहायला मिळत आहे. सैफ अली खान अनेकदा त्याच्या वक्तव्यांमुळेदेखील चर्चेत असतो.

आता अभिनेत्याने नुकतेच त्याचे एक्स पत्नीबरोबर कसे संबंध आहेत यावर वक्तव्य केले आहे. सैफ अली खानने नुकतीच 'टू मच विथ काजोल व ट्रिंकल' या शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी अमृता सिंह बरोबरच्या नात्याबद्दल सैफ अली खान म्हणाला, मी याआधीही या विषयावर खूप बोललो आहे. जेव्हा माझे आणि अमृताचे लग्न झाले, तेव्हा मी २१ वर्षांचा होतो. आयुष्यात गोष्टी बदलतात. आमचे लग्न दीर्घकाळ टिकू शकले नाही. आम्हाला दोन छान मुले आहेत. मला वाटत नाही की मी याआधी कधी बोललो आहे, पण अमृता माझ्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग होती. चित्रपटसृष्टीतील वाटचाल कशी करावी हे तिने समजावून सांगितले, तिच्यामुळे अनेक गोष्टी समजल्या. त्यावेळचे तिचे माझ्या आयुष्यातील योगदान आणि तिने केलेली मदत ही खूप अमूल्य होती. हे दुर्दैव आहे की गोष्टी यशस्वी झाल्या नाहीत. सैफचे बोलणे ऐकल्यानंतर काजोल म्हणाली, तिने तुला खूप उत्तम पद्धतीने मोठे केले, त्यावर सैफ म्हणाला, मी आधी सांगितल्याप्रमाणे मी खूप गोष्टी शिकलो. ती खूप चांगली आई आहे, पण मी खूप नशीबवान आहे. आम्ही कधीतरी महत्त्वाच्या गोष्टींबाबत एकमेकांशी बोलतो. अनेकदा मी जेव्हा आजारी असतो, हॉस्पिटलमध्ये असतो, तेव्हा आमच्यात बोलणे होत असते. पुढे तो म्हणाला की, मी सतत आजारी पडत असतो, त्यामुळे आम्ही संपर्कात असतो. सैफच्या कामाबाबत बोलायचे तर तो सध्या 'हैवान' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. तो लवकरच 'रेस ४' चेदेखील शूटिंग सुरू करणार असल्याचे बोलले जात आहे. आता या चित्रपटांना प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो, हे महत्त्वाचे आहे.

# क्रिती सेननचा मोठ्या चित्रपटातून पत्ता कट



आनंद एल राय निर्मित एका महत्त्वाकांक्षी चित्रपटातून अभिनेत्री क्रिती सेननला वगळण्यात आले आहे. 'नई नवेली' नावाच्या या चित्रपटासाठी क्रितीचे नाव जवळपास निश्चित झाले होते, पण आता तिच्याऐवजी दुसर्‍या अभिनेत्रीने ती जागा देण्यात आली आहे. क्रितीला या चित्रपटातून काढून तिच्या जागी यामी गौतमने घेतले आहे. यामीने 'आर्टिकल ३७०' मधील आपल्या अभिनयाने सर्वांना प्रभावित केले आहे. आता असे म्हटले जात आहे की यामी या हॉरर कॉमेडी प्रकारच्या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट भारतीय लोककथांवर आधारित आहे. यामी गौतमच्या चित्रपटातील प्रवेशानंतर तिच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यापूर्वी क्रिती सेनन मुख्य भूमिकेसाठी निश्चित झाल्याची माहिती मिळाली होती, जे आनंद एल राय यांच्यासोबत तिचे दुसरे सहकार्य ठरले असते. 'तेरे इश्क में' नंतर तिला पुन्हा त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली होती. क्रिती सेननला चित्रपटातून बाहेर काढण्यामागचे नेमके कारण काय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या चित्रपटाच्या प्री-प्रोडक्शन कामाला जानेवारी २०२६ पासून सुरुवात होणार आहे, तर त्यानंतर लगेच चित्रीकरणही सुरू होईल.

सध्या अभिनेत्री क्रिती सेनन तिच्या आगामी 'तेरे इश्क में' या चित्रपटाच्या टीझरमुळे चर्चेत आहे. क्रितीने नुकतेच 'कॉकटेल २' चे चित्रीकरण इटलीमध्ये संपवले आहे, ज्यात ती शाहिद कपूरसोबत दिसणार आहे. पण याचदरम्यान, क्रितीला एका मोठ्या चित्रपटातून बाहेर पडावे लागले आहे.

# 'वॉर २' अखेर ओटीटीवर!



बॉलिवूडमध्ये आठवड्याला नवा चित्रपट येतो, पण काही चित्रपट असे असतात, जे प्रेक्षकांच्या मनात घर करून जातात. २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या अशाच एका जबरदस्त चित्रपटांपैकी एक म्हणजे 'वॉर २'. अभिनेता हृतिक रोशन आणि दाक्षिणात्य सुपरस्टार ज्युनियर एनटीआर यांच्या दमदार अभिनयाने सजलेला हा चित्रपट थिएटरनंतर आता थेट घरी बसल्या पाहता येणार आहे.

'वॉर २' हा चित्रपट १४ ऑगस्टला जगभरात प्रदर्शित झाला होता. त्यामध्ये अभिनेत्री कियारा अडवाणी प्रमुख भूमिकेत झळकली. हा चित्रपट अयान मुखर्जी यांनी बनवला होता आणि त्याची निर्मिती वायआरएफने केली होती. हा चित्रपट आज ९ ऑक्टोबरला नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. ज्यांनी 'वॉर २' थिएटरमध्ये पाहिला नाही, त्यांच्यासाठी हा सिनेमा ओटीटीवर धुमाकूळ घालायला सज्ज झाला आहे. तुम्ही हा चित्रपट नेटफ्लिक्स या स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर पाहू शकता. 'वॉर २' या चित्रपटाची कथा पहिला भाग अर्थात 'वॉर' या चित्रपटाची कथा जेथे संपते तेथून नवीन कहाणीला सुरुवात होते.

'वॉर २' हा चित्रपट धठऋ स्पाय युनिव्हर्सचा भाग आहे. विशेष म्हणजे 'वॉर २' चित्रपटाच्या शेवटी स्पाय युनिव्हर्सचा पुढील चित्रपट 'अल्फा'ची सुद्धा घोषणा झाली आहे.

'अल्फा'मध्ये अभिनेता बॉबी देओल खलनायक म्हणून झळकणार आहे. तर अभिनेत्री आलिया भट आणि शर्वरी वाघ या अभिनेत्री मुख्य भूमिकेत पाहायला मिळतील. तो २५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे.



# सुबोधचा नवा बायोपिक येणार

'हर हर महादेव', 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर', 'संत तुकाराम', 'लोकमान्य: एक युगपुरुष', 'बालगंधर्व' यांसारख्या बायोपिकमध्ये भूमिका वठवणारा सुबोध भावे आत नीम करोली बाबा यांच्या भूमिकेत दिसणार आहे. नीम करोली बाबा यांच्यावर बायोपिक येत आहे.

'श्री बाबा नीब करोरी महाराज' असं सिनेमाचं नाव असून या सिनेमातून त्यांचा जीवनप्रवास उलगडण्यात येणार आहे. या सिनेमात अभिनेता सुबोध भावे नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणार आहे. हा एक हिंदी सिनेमा असून याचं पहिलं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं आहे. 'श्री बाबा नीब करोरी महाराज' सिनेमाच्या पोस्टरवर सुबोध भावे नीम करोली बाबा यांच्या लूकमध्ये दिसत आहे. छोटे केस, थोडी दाढी, कपाळावर टीका आणि घोंगडी घेऊन बसलेल्या नीम करोली बाबा यांच्यासारखाच तो हुबेहुब दिसत आहे. आज लखनऊ मध्ये आमच्या आगामी बाबा नीम करोली यांच्या आयुष्यावर आधारित हिंदी चित्रपटाच्या पोस्टर च अनावरण संपन्न झाले. बाबांची भूमिका साकारण्याचे भाग्य मला लाभले.

लवकरच हा चित्रपट रसिकांसमोर येईल. जय श्रीराम! जय हनुमान!, असं कॅप्शन देत सुबोध भावेने त्याच्या या नव्या सिनेमाचं पोस्टर शेअर केलं आहे. नीम करोली बाबा हे या काळातील दैवी पुरुषांपैकी एक मानले जातात. उत्तराखंडमधील कैंची धाममध्ये त्यांचं आश्रम आहे. वयाच्या १७ व्या वर्षी बाबा नीम करोली यांना देवाबद्दल विशेष ज्ञान मिळाले. ते हनुमानजींना आपले गुरू मानत होते.

बाबांनी आपल्या आयुष्यात जवळपास १०८ हनुमान मंदिर बांधली आहेत. सामान्य माणसासारखे बाबा नीम करोली जगले. अनेक सेलिब्रिटींचे ते श्रद्धास्थान आहे. विराट कोहली आणि अनुष्का शर्मा त्यांच्या आश्रमात गेले होते. तर फेसबुकचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनीही आश्रमाला भेट दिली होती.